**शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,**
**डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र.**
**परिपत्रक**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या शतकोत्तर रौप्यमहोत्सवी १२७ व्या जयंतीनिमित्त शनिवार दिनांक १४ एप्रिल २०१८ रोजी सकाळी ९.३० वाजता विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस मा. प्रा. डॉ. गोपाल गुरू, मा. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे शुभहस्ते पुष्पहार अर्पण करण्याचा समारंभ आयोजित केला आहे. तसेच सदर समारंभानंतर लगेच मुख्य इमारतीमधील राजर्षी शाहू सभागृहात मा. कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांचे अध्यक्षतेखाली तसेच मा. डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू, मा. डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, कुलसचिव, यांच्या प्रमुख उपस्थितीत **ज्येष्ठ अभ्यासक, विचारवंत, विश्लेषक, मां. प्रा. डॉ. गोपाळ गुरू, ( प्राध्यापक, जवाहरलाल नेहरू विद्यापीठ व संपादक इकॉनॉमिक अँड पॉलीटीकल विकली. ) यांचे ''डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची लोकशाही संकल्पना''** या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. तरी या समारंभास विद्यापीठातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनींनी उपस्थित राहवे. ही विनंती.

Mahajan 9/4/18

प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन
संचालक,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर संषोधन व विकास केंद्र.

संदर्भ क्रं. शिवाजी वि/डॉ. बा. आ. सं.व वि.कें/ 2035
दिनांक : ०९/०४/२०१८

प्रति,

१. सर्व पदव्युत्तर अधिविभाग प्रमुखांनी आपल्या अधिविभागातील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी,विद्यार्थी/विद्यार्थीनी यांना वरील समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.

२. सर्व प्रशासकीय विभागप्रमुखांनी आपल्या विभागातील सर्व शिक्षकेत्तर सेवकांना समारंभास उपस्थित राहण्याबद्दल सुचना द्याव्यात.

३. सर्व रेक्टर्स यांनी वसतिगृहातील नोटीस बोर्डवर हे परिपत्रक लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सूचना द्याव्यात.

४. प्रमुख, डॉ. आण्णासाहेब पवार विद्यार्थी भवन यांनी हे परिपत्रक नोटीस बोर्डावर लावण्याची व्यवस्था करावी व विद्यार्थ्यांना या कार्यक्रमास उपस्थित राहण्यासाठी सूचना द्याव्यात.

५. आभियांत्रिकी विभागप्रमुखांनी खालीलप्रमाणे कार्यवाहीची सूचना संबंधीतांना द्यावी.

अ) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा द्वारमंडप (पोर्च) येथे उपलब्ध करून दयावी व कार्यक्रम संपलेनंतर परत आहे त्याठिकाणी लावण्याची व्यवस्था करणेबाबत.

ब) कार्यक्रमाचे ठिकाणी व परिसरात स्वच्छता ठेवण्याची व्यवस्था करण्याबाबत.

क) कार्यक्रम ठिकाणी लाईटची व ध्वनीक्षेपकाची सोय करणेबाबत.

६. उद्यान विभागप्रमुखांनी कार्यक्रमाच्या ठिकाणी योग्य त्या कुंडया, फ्लॉवर पॉट द्यावेत तसेच कार्यक्रमाची सुशोभितता वाढविण्याची योग्य ती कार्यवाही करावी.

७. डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचा शिपाई यांनी पुष्पहार व फुले यांची व्यवस्था करावी.

८. श्री. रमेश गवळी, परीक्षा विभाग यांनी समारंभाच्या ठिकाणी रांगोळीची व्यवस्था करावी.

९. श्री. प्रकाश चौगुले, जमादार व श्री. ए. जी. सावंत, जमादार यांनी कार्यक्रमाचे ठिकाणी आवश्यक टेबल, स्टुल उपलब्ध करून दयावे व कार्यक्रमाच्या वेळी एक शिपाई या विभागाच्या शिपायाचे मदतीस देणेचा आहे. अथवा स्वत: उपस्थित रहावयाचे आहे.

१०. भांडार विभागप्रमुखांनी कार्यक्रमासाठी इस्त्रीचे पांढरेशुभ्र / स्वच्छ पुरेसे कापड पुरविण्याची व्यवस्था करावी.

—०००—